# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

**(दिनांक 06.03.2018 ची सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली)**

**दिनांक 28.03.2018 रोजी दुपारी 04.00 वाजता** नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकिय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| अ. सत्तार अ. गफुर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पवळे उमेश देवराव | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| खान फारुख अली इलीयात खान | स. शेर अली अ. महेबुब अली |
| देशमुख सतिश पुंडलीकराव | येवनकर मोहीनी विजय |
| तिडके प्रशांत विठ्ठल | रावत भानुसिंह गयादनसिंह |
| मुथा कांताबाई प्रकाशचंद | गोडबोले ज्योत्सना राजु |
| वैशाली मिलींद देशमुख | |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य उपआयुक्त तथा प्राधिकृत अधिकारी श्री रत्नाकर वाघमारे, मुख्यलेखाधिकारी श्री संतोष कंदेवाड, मुख्य लेखा परिक्षक श्री आर. एस. कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**विषय क्रं 01**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 च्या अधिन राहून मा. आयुक्त, नावाशमनपा नांदेड यांनी सादर केलेले नांवाशमनपाकेचे सालसन 2017-18 चे सुधारीत व सालसन 2018-19 चे मूळ अंदाजपत्रकास मान्यता देवून ते मान्यतेसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करणे बाबत.

**सभापती** नावाशमनपाकेचा सालसन 2017-18 चे सुधारीत अंदाजपत्रकात ठरावात दर्शविण्यात आल्याप्रमाणे खर्च बाजूस सुधारणा करुन उर्वरीत अर्थसंकल्प जसेच्या तसे मंजुर करण्यासाठी महासभेस शिफारस करण्यात येते सन स्थायी समिती सदस्यांच्या सुचने प्रमाणे वार्ड विकास निधी अंतर्गत स.सदस्यांच्या शिफारशीनूसार त्यांचे प्रभागातील प्रत्येक सदस्यांना 10.00 लक्षाची कामे करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात येत आहे. मूळ अर्थसंकल्पास ज्याबाबीकरीता तरतूद करण्याची शिफारस केली आहे त्याप्रमाणे सन 2018-19 चे मूळ अर्थसंकल्पात तरतूदी करण्यासाठी व उर्वरीत आयुक्तांचे अर्थसंकल्पास व त्यातील प्रस्तावास मान्यता देण्यासाठी महासभेस शिफारस करण्यात येते, हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**ठराव क्र. 112** **ठराव**

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगपालिका नांदेड यांनी स्थायी समिती समोर सादर केलेल्या सालसन 2017-2018 चे सुधारीत अर्थसंकल्पास जसेच्या तसे मंजुर करुन त्यास मान्यता देण्यासाठी हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करते. तसेच आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले सालसन 2018-2019 चे मूळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध लेखाशिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून उर्वरीत अंर्थसंकल्पास तसेच अर्थसंकल्पात आयुक्तांनी केलेल्या प्रस्तावसह जसेच्या तसे मंजुर करण्यासाठी ही स्थायी समितीची सभा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस शिफारस करते.

**सालसन 2018-19 चे मुळ अंर्थसंकल्पचे जमा बाजु**

| अ. क्र. | लेखा शिर्ष | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| 1 | विशेष पाणी कर | 18,00,00,000/- | 21,65,00,000/- |
| 2 | मालमत्ता विभाग अभय योजना | 00 | 3,00,00,000/- |

**सालसन 2018-19 चे मुळ अर्थसंकल्पाची – खर्च बाजू**

| अ. क्र. | लेखा शिर्षक | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | स्थायी समितीने सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| 1 | नगरसेवक स्वेच्छा निधी | 5,00,00,000/- | 8,60,00,000/- |
| 2 | क्रिडा व सांस्कृतीक कार्यक्रम | 2,15,00,000/- | 5,00,00,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| **3** | शहरातील महत्वाच्या चौकात 6 झोन मध्ये वर्दळिच्या ठिकाणी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणे | 5,00,000/- | 25,00,000/- |

1. सालसन 2018-19 मध्ये शहरातील चौकांचे सुशोभीकरण करण्यासाठी **चौक दत्तक योजना** राबविण्यात येणार आहे.

2. गुरु-ता-गद्दी सोहळा 2008, JNNURM, BSUP, नगरोत्थान, दलितवस्ती सुधार योजना, तसेच विविध शासकिय योजनेअंतर्गत शहरात विकासाची कामे करण्यात आली आहेत, त्या अनुषंगाने सदर कामांची योग्य देखभाल व दुरुस्ती होणे आवश्यक आहे. म्हणुन **सन 2018 वर्ष हे भौतिक सोयीसुविधा देखभाल व दुरुस्ती वर्ष म्हणुन पाळण्यात येणार आहे**.

**सभापती** आजच्या अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.